# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/ 285 /2022 Dt : 02/11/2022

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:— विद्यापीठ स्तरीय शिबीराचे आयोजन करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत.

महोदय,

युवा कल्यान क्रिडा मंत्रालय, भारत सरकार अंर्तगत रासेयो संहिता भाग ३ अंर्तगत प्रकरण १ २ ३ अन्वये निर्देशित माहीतीनुसार राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर आयोजनाबाबत दरवर्षी महाविद्यालयाला सुचित करण्यात येते मा. कुलगुरु तथा अध्यक्ष रासेयो यांच्या मान्यतेनुसार खालील बाबीसंदर्भात आपले लक्ष वेधुन नोंद घेण्यासंदर्भात विनंती करण्यात येते आहे.

१) विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालावधीत विद्यापीठ स्तरीय शिबीराचे प्रस्ताव कार्यालयाला सादर करणे अनिवार्य आहे. शिबीर प्रस्तावाशिवाय आयोजीत शिबीराला अनुदान मान्य करणे शक्य होणार नाही.

२) विद्यापीठ स्तरीय शिबीराचे आयोजन महाविद्यालय परिसरात न करता दत्तक ग्रामातच शिबीर आयोजन करणे अनिवार्य आहे. तसेच महाविद्यालय परिसरात शिबीर आयोजनाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाला सादर करण्यात येऊ नये. कृपया गांभिर्याने नोंद घ्यावी.

३) आयोजीत शिबीराचा कालावधी पुर्णत: सात दिवसाचा असने अनिवार्य आहे. शिबीराकरीता मंजुर विद्यार्थी संख्येनुसार महिला व पुरुष कार्यक्रम अधिकारीसह शिबीर कालावधीत उपस्थित असने अनिवार्य आहे. रासेयो स्वंयसेवकांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, या करीता शिबीराचे नियोजन विद्यापीठ परिक्षेचा कालावधी लक्षात घेवुन करण्यात यावे.

४) आयोजित शिबीरात दत्तक ग्रामातील ग्रामस्थाचा सहभाग विविध उपक्रमांतर्गत उदा. श्रमदान, बौध्दिक सत्र, व सांस्कृतीक संदेशपर कार्यक्रम इत्यादीमध्ये असावा.

५) शिबिरामध्ये शासन निर्देशित व तसेच विद्यापीठाने सुचित केलेले अभिनव प्रकल्प, सर्वेक्षण, इत्यादीचा समावेश असावा.

६)विद्यापीठ स्तरीय शिबीराचे आयोजनापुर्वी जवळच्या पोलीस स्टेशन तसेच स्थानीक पोलीस पाटिल यांना सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन पुर्वसुचना देण्यात यावी.

७) शिबीरार्थी शिबीरात सहभागी होण्यापुर्वी त्याचे रासेयो बाबत उदबोधन वर्गाचे आयोजन तसेच शिस्त व नियमाचे पालन करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. शक्य तोवर शिबीराच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, आभार प्रदर्शन, प्रार्थना, इत्यादी जबाबदारी शिबिरार्थींना देण्यात यावी.

८) विद्यापीठ स्तरीय शिबीर कालावधीत लोक सहभाग मिळण्याकरीता दत्तक ग्रामाच्या मध्यभागी किवा वस्तीमध्ये शिबीराचे आयोजन करणे आवश्यक आहे. जणेकरुन ग्रामस्त लोक सहभाग संपुर्ण पणे मिळेल. लोक सहभाग मिळु शकत नसेल तर त्या ठिकानी शिबीराला मान्यता देता येणार नाही. किवा आयोजीत शिबीर मंजुर करता येणार नाही. कुपया नोंद घ्यावी.

९) शिबिराच्या नियमांचे कटाक्षाणे पालन करण्याबाबत व स्वत:जबाबदारीबाबत पुरुष कार्यक्रम अधिकारी व महीला कार्यक्रम अधिकारी शिबीरात सहभागी असणे व पालकाचे हमीपत्र शिबीरार्थीकडुन घेण्यात यावे.

१०) शिबीर स्थळी रासेयो स्वंयसेवक रासेयो बॅच तसेच बौध्दिक सत्रात रासेयो डायरीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) शिबीरस्थळी लावण्यात येणाऱ्या बॅनरवर विद्यापीठाचा, महाविद्यालयाचा शिबिर स्थळ व कालावधी आणि आझादी का अमृत महोत्सव लोगो असणे आवश्यक आहे व नामोल्लेख असणे अनिवार्य आहे. तसचे शिबिर स्थळासंदर्भात माहीती व्हावी या करीता मुख्य मार्गावर शिबीर स्थळ निर्देशित फलक लावणे अनिवार्य आहे.

१२) शिबीर आयोजन कार्यक्रम पत्रीका मा. कुलगुरु मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना nssmantralaya@gmail.com या ई मेल आयडिवर व मा. संचालक रासेयो प्रादेशिक केद्र, पुणे यांना nssrcpune@gmail.com या ई मेल आयडिवर तसेच रासेयो कार्यालय गोंडवाना विद्यापीठ nssdsw.gug@gmail.com या ई मेल आयडिवर शिबीर सुरु होण्याच्या दोन दिवस पुर्वी पाठविणे अनिवार्य आहे.

१३) शिबीराच्या आयोजनानंतर १५ दिवसाचे आत शिबीराचे लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र संपुर्ण माहीतीसह कार्यालयाने दिलेल्या विहीत प्रारुपातच सादर करणे अनिवार्य आहे. निर्धारीत कालावधीनंतर प्राप्त हिशेबाचे समायोजन किवा मान्यता देणे शक्य होणार नाही.

१४) विशेष शिबीरच्या कार्यक्रमाचे छायाचित्र जीपीएस मैप कैमरा ने काढावे. अन्य छायाचित्र ग्राहय धरल्या जाणार नाही.

१५) विशेष शिबीर मध्ये मतदान जनजागृती, कोविड लसीकरण या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करावे.

कृपया उपरोक्त बांबीसंदर्भात संबधीत कार्यक्रम अधिकारीना गांभीर्याने नोंद घेण्याबाबत सुचित करावे, ही विनंती.

टिप:—१) राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन स्थानिक प्रशासनाची मान्यता घेऊन प्रशासकिय अधिकारी यांना बोलावणे आवश्यक आहे.

**२) दिनांक ०७ नोव्हेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५. ०० पर्यंत सदर विद्यापीठ स्तरीय शिबीराचे प्रस्ताव सादर करावे.**

02/11/22

**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**